# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/10/2023 (बुधवार) सकाळ


## मौदा हद्दीत मिळून आलेल्या युवकाच्या मृत्यूचे गुढ उकलले

मौदा हद्दीत फिर्यादी अनिल धर्मदास पाटील वय ५५ वर्ष, रा. चिखली ता. कामठी यांचा मुलगा रजनिकांत पाटील याचा अंबाडी येथे राहणारा मंगेश भुसारी याचे सोबत वडोदा बाजारात झगडा भांडण झाले होते त्या कारणावरून पोलीस स्टेशन मौदा येथे गुन्हा दाखल असुन दोन महिने जेल मध्ये राहीला होता व माहे जुन मध्ये जेल मधुन सुटुन आला असुन दिनांक २४/१०/२०२३ रोजी वडोदा बाजारात पानठेल्याचे मागे आरोपीतांनी संगनमत करून जुन्या झगडा भांडणाचे कारणावरून मनात सुड भावना ठेवुन फिर्यादीचे मुलाला डोक्यावर, तोंडावर व शरीराचे ईतर भागावर लोखंडी शस्त्राने वार करून जिवानीशी ठार मारले. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा गुन्हे रजि. नं. ९७४/२०२३ कलम ३०२, ३४ भादंवि अन्वये खूनाचा गुन्हा नोंद करण्यात आला. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांना आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले. सदर प्रकरणी गोपनीय माहितीच्या अधारे तसेच तांत्रीक तपासा दरम्यान सदर गुन्हयातील आरोपी हे भंडारा जिल्हयातील मेंढा येथे लपून बसल्याचे माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन इसम नामे १) मंगेश श्रावण भुसारी, वय ३३ वर्ष, रा. अंबाडी ता. कामठी (२) तेजस रुपेंद्र पाटील, वय १९ वर्ष, रा. नागपूर (३) गौतम केवल पाटील, वय २८ वर्ष, रा. मोहगाव, चाफेकडी ता. कामठी यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेवून गुन्हयासंबधी सखोल विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे आढळून आल्याने त्यांना अटक करण्यात आली. पुढील कारवाई करिता आरोपीतांना पो स्टे मौदा यांच्या ताब्यात देण्यात आले.

गुन्हयाचा पुढील तपास पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. पुंडलिक भटकर, पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस निरीक्षक श्री. पराग पोटे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर